पुढारी दि. ०२/०४/२०

# ‘रोडरॉबरी’तील कंटेनर सोनखेड पोलिसांनी पकडला

## आंतरजिल्हा चोरट्यांची टोळी

## फिल्मीस्टाईल पाठलाग;

**नांदेड,पुढारी वृत्तसेवा :** शहरासह जिल्ह्यात दुचाकीसह मोठ्या वाहनांची चोरी करण्याचा सपाटा चोरट्यांनी लावला होता. हायवासारखी मोठी आणि महागडी वाहने चोरीला चोरीला जात असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते; मात्र ‘क्राईम ब्रँच’ने हायवा चोरट्यांचे रॅकेट उद्ध्वस्त करुन तीन चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात यश मिळविल्यानंतर आता सोनखेड पोलिसांनीही एक चमकदार कामगिरी केली आहे. नायगाव येथून चोरीला गेलेले नॅशनल परमीट असलेले भले मोठे कंटेनर फिल्मी स्टाईलने पकडून एका चोरट्यालाही जेरबंद केले आहे. या कामगिरीबद्दल वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी ठाणेदार विशाल भोसले आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले आहे.



विशाल भोसले

नायगाव ठाणे क्षेत्रातील रातोळी पुलावर डीएन-०९ यु-९१५३ या क्रमांकाचे कंटेनर अडवून सात चोरट्यांनी चालकाला बेदम मारहाण केली. तसेच त्याचे दोन्ही हात आणि पाय बांधून त्याला मुखेड ठाणे क्षेत्रातील शिकारा या गावात फेकुन देऊन कंटेनर घेऊन पळ काढला होता.



कंटेनर चोरीची माहिती व चोरट्यांचा तपास करण्याच्या सुचना नियंत्रण कक्षाकडून जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना देण्यात आल्या होत्या. सोनखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार विशाल भोसले यांनी या संदर्भात पोलीस कर्मचारी रमेश वाघमारे आणि वाहन चालक अतूल नागरगोजे या दोघांना कंटेनर संबंधी माहिती देऊन रात्रगस्तीवर पाठविले होते, तर भोसले या सर्व घडामोडीवर ‘वॉच’ ठेवून होते.

मंगळवारी रात्री गस्त सुरु असतांना नांदेड ते लोहा या राष्ट्रीय महामार्गावरुन एक कंटेनर भरधाव वेगात लातूरकडे जात असल्याची माहिती भोसले यांना मिळाल्यानंतर त्यांनी गस्तीवरील कर्मचाऱ्यांना सतर्क केले. काही वेळातच ते चोरीचे कंटेनर वेगाने जात असल्याचे गस्तीवरील कर्मचाऱ्यांना दिसल्यानंतर त्यांनी चालकाला थांबण्याचा इशारा केला; मात्र चालकाने कंटेनर न थांबविता त्याचा वेग अधिक वाढविला. त्यामुळे संशय आल्याने कर्मचाऱ्यांनी त्याचा पाठलाग सुरु केला. काही वेळ पाठलाग केल्यानंतर कंटेनरच्या पुढे जाऊन त्यांनी आपले वाहन आडवे लावले आणि चालकाने कंटनर थांबवले. सुदैवाने चालकाने कंटेनर थांबविले अन्यथा दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांचा जीवावर बेतण्याचा प्रसंग उद्भवला असता.

कंटेनर थांबताच आतील पाच चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले; मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने पाठलाग करुन गंगाधर बळीराम सतकलवार याला जेरबंद केले. त्याला ‘सुंदरी’ दाखविताच त्याने चोरीची कबुली दिली असून अन्य साथीदारांची नावेही पोलिसांना सांगितली आहेत. पकडलेले कंटेनर सोनखेड पोलिसांनी अधिक तपासासाठी नायगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. हे कंटेनर लातूरकडे जात असल्याने या प्रकरणात आंतरजिल्हा चोरट्यांची टोळी सक्रीय असावी, असा संशय पोलिसांना आहे.

पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधिक्षक अबिनाशकुमार, पोलिस उप अधिक्षक डॉ.सिद्धेश्वर भोरे यांच्या नेतृत्वाखाली ठाणेदार विशाल भोसले, रमेश वाघमारे, अतूल नागरगोजे यांनी मोहिम फत्ते केली.